**सन २०१७-१८ या वर्षाकरिता निवडलेल्या गावातील कामाचे नियोजन करणे व समग्र आराखडयाला (Net Planning) मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- जशिअ २०१७/प्र.क्र. ४२६/जल-७**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०८ फेब्रुवारी, २०१८.

**<u>प्रस्तावना :-</u>**

जलयुक्त शिवार अभियान या कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ या वर्षाकरिता टंचाईमुक्त करण्यासाठी निवडण्यात आलेल्या गावांमधील कामाचे नियोजन व प्रभावी अंमलबजावणी करिता जलसंधारण विभागाने मागील काही कालावधीत निर्गमित केलेल्या विविध सूचना तसेच मा. मंत्री मृद व जलसंधारण यांनी विभागावार घेतलेल्या बैठकीत दिलेले निर्देश विचारात घेवून सन २०१७-१८ या वर्षाकरिता निवडलेल्या गावामधील कामाचे नियोजन करावयाचे आहे. गावाच्या तयार करण्यात येणाऱ्या समग्र आराखडयास (Net Planning) ला जिल्हास्तरीय समितीने मान्यता दयावयाची असून त्यांनतर विभागीय समितीकडे सदर समग्र आरखडा मान्यतेसाठी सादर करावयाचा आहे. तसेच जिल्हास्तरीय समितीने समग्र आराखडयाला मान्यता दिल्यानंतर कामाची सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन अशा कामांना त्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता व निधीस्त्रोत निहाय सक्षम प्राधिकाऱ्याची प्रशासकीय मान्यता घेण्याबाबत कार्यवाही करावयाची आहे. सन २०१६-१७ या वर्षी निवडण्यात आलेल्या गावातील कामे अद्यापही प्रगती पथावर असून सदर कामे पूर्ण करण्यासाठी सन २०१७-१८ या वर्षाकरिता अभियानासाठी विशेष निधी अभिसरण (Gap Funding) करिता करण्यात आलेल्या तरतूदीमधून सुमारे रु.७०० कोटी इतकी रक्कम सन २०१६-१७ या वर्षाच्या गावामधील कामाकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच रु.२५० कोटी इतकी रक्कम सन २०१७-१८ या वर्षाच्या गावांकरिता विशेष निधी अभिसरण (gap funding) करिता उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**शासन निर्णय :-**

जलयुक्त शिवार अभियान या कार्यक्रमांतर्गत सन २०१७-१८ या वर्षी टंचाईमुक्त करण्यासाठी निवडण्यात आलेल्या गावांच्या समग्र आराखडयास (Net Planning) जिल्हा स्तरीय समितीची मान्यता देण्यास व त्यानुसार अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यास आणि समग्र आराखड्याची अंमलबजावणी करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी यांनी हा शासन निर्णय विचारात घेवून अभियानाबाबत सन २०१७-१८ या वर्षाकरिता निवडलेल्या गावांच्या समग्र आराखडयास (Net planning) व त्यामधील कामांना प्रशासकीय मंजुरी देण्याबाबत व अंमलबजावणी करण्याची कार्यवाही

करावी.सन २०१७-१८ च्या गावातील कामांसाठी उर्वरीत विशेष निधी अभिसरणानूसार सन २०१८-१९ मध्ये उपलब्ध करून देण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२०८१५०५२३८२२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Eknath Rajaram Dawale

Digitally signed by Eknath Rajaram Dawale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=499dd4df91587ffef1e20a2ee9e560dd0777e49ff6cfc838f362fdbb58c58e7b, cn=Eknath Rajaram Dawale
Date: 2018.02.08 17:05:37 +05'30'

**( एकनाथ डवले )**
सचिव (जलसंधारण व रोजगार हमी योजना
महाराष्ट्र शासन

**प्रति :-**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा.विरोधी पक्षनेता,विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. सर्व सन्माननीय विधानसभा/विधान परिषद व संसद सदस्य,
५. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
६. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
७. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
८. अपर मुख्य सचिव (कृषी),कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई,
९. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई
१०.अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुर्नवसन), मंत्रालय, मुंबई,
११.आयुक्त (कृषि),कृषि आयुक्तालय, पुणे-४११००१.
१२.विभागीय आयुक्त (सर्व)
१३.संचालक (मृदसंधारण),कृषि आयुक्तालय, पुणे-४११००१.
१४.मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) , पुणे.
१५.प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे,
१६. संचालक,महाराष्ट्र सुदूर सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१७ .संचालक, भूजल व सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१८. मुख्य कार्यकारी अधिकारी, वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा, पुणे.